## माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान,सांगोला

नोंदणी क्र. F 781

देशपांडे गल्ली,केळकर हॉस्पिटल समोर,

मु.पो. सांगोला,जि. सोलापूर

### ठळक घडामोडी - ऑक्टोबर 2022 ते मार्च 2023

सादर सस्नेह नमस्कार,

आपल्यासारख्या अनेक ज्ञात अज्ञात हितचिंतक देणगीदारांच्या आर्थिक सहकार्याने संस्थेची वाटचाल सुकर झाली आहे. आज आपल्यापुढे संस्थेच्या ऑक्टोबर 2022 ते मार्च 2023 च्या विभागवार ठळक घडामोडी सादर करीत आहोत.

## अ) महिला सबलीकरण

**1) आरोग्य** - अ)






- मा. ना. श्री चंद्रकांत दादा पाटील, उच्च तंत्रशिक्षण व वस्त्रोद्योग आणि संसदीय मंत्री, महाराष्ट्र राज्य पुरस्कृत माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान आणि डॉ. केळकर हॉस्पिटल सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. केळकर हॉस्पिटल मध्ये रविवार दि. 13 नोव्हेंबर 2022 रोजी गर्भपिशवीचे मोफत तपासणी शिबीर संपन्न झाले.
- योग्य तो सल्ला, औषधोपचार
- सांगोला तालुका आणि आसपासच्या गावातील 22 आर्थिकदृष्ट्या गरीब महिलांना शिबिराचा लाभ .
- गर्भपिशवीची शस्त्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे व त्यांची आर्थिक परिस्थिती नाही अशा 12 महिलांची मोफत शस्त्रक्रिया.
- महिलांची ब्रेस्ट कॅन्सर ची तपासणी आणि मार्गदर्शन -
- लाभार्थी - 85

- उत्कर्ष विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनीं आणि शिक्षकांसाठी श्री.प्रशांत केळकर, नाशिक यांनी 'आत्मभान' ह्या 'पौगंडावस्थेतील बदलां'विषयी मार्गदर्शन तसेच Associated for Social And Health Management Initiatives India, यांचेतर्फे 260 विद्यार्थीनींना 'सॅनिटरी नॅपकीन' चे वाटप

ब) किशोर किशोरी विकास वर्ग -

- ज्ञानदीप विद्यालय,सांगोला येथे विद्यार्थिनीसाठी कळी उमलताना कार्यक्रम संपन्न. या कार्यक्रमात -
- मुलीना आरोग्य व स्वच्छता याबाबत माहिती
- तसेच मासिक पाळी विषयी शास्त्रोक्त माहिती ची चित्रफित आणि
- मुक्त चर्चा करण्यात आली.



- गार्डी गावात प्रथमच खुला किशोरवर्ग सुरू.
- किशोरवर्गाच्या वेळी 'जशी संगत तशी पंगत' या विषयावर किशोरांना मार्गदर्शन.
- यावेळी आपल्या मनातले काही प्रश्न मुक्त चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याची किशोरांना संधी
- किशोर व किशोरींनी शाळेत तयार केलेली परसबाग



## 2) अन्यायाविरुद्ध संघर्ष



- 'आयोग तुमच्या दारी' या उपक्रमांतर्गत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या समोर आपल्या महिला समुपदेशन केंद्राच्या 2 अर्जांच्या तक्रारींचे निवारण .

- समुपदेशन केंद्रात या वर्षी एकूण 280 अर्ज नोंदवले गेले . 60 टक्के अर्जांवर यशस्वी तडजोड करून मिटवण्यात आले.

## 3) कौशल्य विकसन केंद्र -

1)



- सिडबी व मिटकॉन यांच्या संयुक्त विद्यमाने 'Cleaning Products' तयार करणे' प्रशिक्षण संपन्न.
- लाभार्थी - 29 महिला.
- प्रशिक्षणात तयार केलेल्या उत्पादनांना भरपूर प्रतिसाद.
- या महिलांना मिटकॉन तर्फे उद्योग आधार कार्ड दिले जाणार

2) अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत संस्थेच्या उत्कर्ष कलावर्धिनी चा 100 % निकाल

3) Associated for Social And Health Management Initiatives India या संस्थेतर्फे कौशल्य विकसन केंद्रातील 6 विद्यार्थिनींना प्रशिक्षण फी साठी अर्थसहाय्य मिळाले.

**4) आर्थिक स्वावलंबन -**





दि. 24 डिसेंबर 2022 रोजी रोटरी क्लब ऑफ सांगोला यांच्या सहकार्याने बचतगटातील महिलांचा वार्षिक मेळावा उत्साहात संपन्न.

- उपस्थिती - 500 महिला.
- संस्थेतर्फे सौ. प्रिया कुलकर्णी यांना 'श्रमलक्ष्मी' पुरस्कार
- रोटरी क्लब ऑफ सांगोला तर्फे सौ. राजाक्का साळुंखे यांना 'रणरागिणी' पुरस्कार
- बचतगटातील सौ. मैना खडतरे यांना 'जिद्द' पुरस्काराचे वितरण
- जिल्हा अग्रणी बँकेचे 'आर्थिक साक्षरता सल्लागार समुपदेशक' श्री. हनुमंत भालेराव यांनी महिलांना 'आर्थिक साक्षरता आणि बचतगटाबाबत' मार्गदर्शन
- नाबार्ड,सोलापूरचे श्री.नितीन शेळके यांचेकडून 'नाबार्ड' च्या महिलांसाठी सुरु असलेल्या विविध योजनांची माहिती.

**5) पर्यावरण साक्षरता -** जलदूत - फेज 2 प्रकल्पाचा दि. 17 व 18 मार्च रोजी समारोप संपन्न. संस्थेचा 'जलसंधारणात उत्कृष्ट कार्य करणारी संस्था' म्हणून गौरव.

**ब) दर्जेदार शिक्षण - (उत्कर्ष विद्यालय)**

- शिरसी येथे झालेल्या निकाली कुस्ती मध्ये पैलवान पृथ्वीराज साळुंखे याने रु. 5000/- चे बक्षीस.
- सायन्स प्रोजेक्ट, बार्शी आयोजित सायन्स वर्कशॉप, activity स्पर्धा व तालुकास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये उत्कर्ष विद्यालयास तीन गोल्ड व दोन सिल्वर मेडल प्राप्त. गोल्ड मिळालेली विद्यार्थीनीची जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड
- संस्था अध्यक्षांच्या संकल्पनेनुसार तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय खेळाच्या स्पर्धांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळण्यासाठी अंडी व शेंगदाणा लाडू वाटप.

- **इ. 5 वी व इ. 8 वी स्कॉलरशिप चा निकाल जाहीर**

इ. 5 वी सहभागी विद्यार्थी: 12 विद्यार्थी गुणवत्ता यादीत (40% प्रमाण)

इ. 8 वी सहभागी विद्यार्थी: 9 विद्यार्थी गुणवत्ता यादीत (31% प्रमाण).



कब - बुलबुल, स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात आपल्या विद्यार्थिनींनी सलग दुसऱ्यांदा फिरता चषक जिंकला.

## क) जलसंधारण -

- ॲड फिझ - ग्रंथाली प्रस्तुत दिवाळी पहाट या कार्यक्रमात मुंबई येथे संस्थेचे जलदूत श्री.मधुकर पवार यांचा सत्कार



## सांस्कृतिक -

- नातू फौंडेशन,पुणे तर्फे संस्थेच्या अध्यक्षा डॉ.संजीवनी केळकर यांना सेवागौरव पुरस्कार



## विशेष घडामोडी -

- दि. 11 व 12 फेब्रुवारी या दिवशी मुंबई येथील विले पार्ले येथील 'सावरकर कला केंद्रात' 'देणे समाजाचे '- एक सद्भावना महोत्सवात सहभाग
- या कार्यक्रमास संस्थेच्या स्टॉल ला मुंबईकरांचा चांगला प्रतिसाद
- संस्था वर्धापन दिनानिमित्त डॉ.गजानन नाटेकर यांचे ‘सामर्थ्य आहे चळवळीचे’ याबाबत मार्गदर्शन.
- संस्थेच्या प्रत्येक विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार संपन्न.
- संस्थेच्या महिला मेळाव्यात 100 टक्के उपस्थिती ची एखतपूर येथील सावित्रीबाई फुले बचतगटातील 13 महिलांना प्रमाणपत्रे प्रदान.

**या घडामोडींशिवाय इतर अनेक छोटे छोटे उपक्रम आपल्या समर्थ हातांमुळे यशस्वी होत आहेत. आपले ‘सत्पात्री’ दिलेल्या दानाचा योग्य प्रकारे विनियोग होत आहे याची खात्री असावी.**

**देणगीसाठी तपशील खालील प्रमाणे** -

**1) Money Transfer - देणगी साठी संस्थेच्या बँक खात्याचा तपशील-**
**खात्याचे नाव - माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, बँकेचे नाव- बँक ऑफ महाराष्ट्र**
**खाते क्रमांक - 60046857205 , IFSC No. – MAHB0001467**

**2) संस्थेच्या matabalak.org या वेबसाईट वरून ‘Donate Us’ मधून देणगी देऊ शकता.**

**आपल्या अर्थसहय्याबद्दल आम्हाला विश्वास आहे. लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.**

**संपर्कासाठी मोबाईल क्र. 7588222250(WA)**

धन्यवाद !

**आपली स्नेहांकित,**
**डॉ. संजीवनी केळकर**
**अध्यक्षा**
**माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला**